**L. A. BILL No. XXXIV OF 2026.**

*A BILL*

TO AMEND THE MAHARASHTRA STATE COMMISSION FOR SCHEDULED CASTES ACT, 2025.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४.**

**महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग अधिनियम, २०२५ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २४ जून, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक ७ जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग २०२५ चा महा. ३७. अधिनियम, २०२५ यात सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, त्यांनी २०२६ चा महा. अध्या. ३. दिनांक २५ मे २०२६ रोजी, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) अध्यादेश, २०२६, हा प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २५ मे २०२६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग अधिनियम, २०२५ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २ मधील, खंड (ख) मध्ये, "अध्यक्ष" या मजकुरानंतर, ", उपाध्यक्ष" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. २०२५ चा महा. ३७.

सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मधील, पोट-कलम (२) मध्ये, खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईलः-

"(क-१) उपाध्यक्ष, ज्यास सदस्यांमधून नामनिर्देशित करण्यात येईल;".

सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ याचे निरसन व व्यावृत्ती.

**४.** (१) महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) अध्यादेश, २०२६, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०२६ चा महा. अध्या. ३.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४.]**

**[महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग अधिनियम,
२०२५ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. संजय शिरसाट,**
सामाजिक न्याय मंत्री.**]**

**(विधानसभेने दिनांक २४ जून, २०२६ रोजी
संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक ७ जुलै, २०२६ रोजी
संमत केल्याप्रमाणे.)**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई